
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार २५ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३४३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता * समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# मी कोणाच्या नादी लागत नाही आणि लागलं तर सोडत नाही–देवेंद्र फडणवीस

वादळवार्ता/मुंबई
राज्यात माझ्यावर टीका करण्यासाठी काही सुपारीबाज तयार झाले असून ते सुपारी घेऊन आपल्यावर आरोप करतात, श्याम मानव हे त्यांच्या नादी लागलेत का हे पाहावं लागेल, असा खोचक टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी लगावला.उद्धव ठाकरे, अजित पवार आणि इतर नेत्यांवर खोटे आरोप करावेत यासाठी फडणवीसांनी अनिल देशमुखांवर दबाव आणल्याचा आरोप श्याम मानव यांनी केला होता.त्यावर फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत मानव यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. फडणवीस म्हणाले की, श्याम मानव मला इतके वर्षे ओळखतात, आरोप करण्यापूर्वी त्यांनी मला एकदा विचारायला हवं होतं. अलिकडच्या काळात अनेक सुपारीबाज तयार झाले आहेत. सुपारी घेऊन आरोप करणे हे त्यांचं काम आहे. त्या सुपारीबाजांच्या नादाला श्याम मानव लागले तर नाही ना, हे एकदा पाहावं लागेल. मनोज जरांगे यांच्याविरोधात निघालेल्या अटक वॉरंटमध्ये राज्य सरकारचा काही संबंध नसल्याचं सांगत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मनोज जरांगेंची केस आहे ती २०१३ सालची आहे. या पूर्वीदेखील त्यांच्या विरोधात नॉन बेलेबल वॉरंट काढण्यात आलं होतं. पण ते हजर राहिल्यानंतर ते रद्द झालं. आता पुन्हा ते तारखेला गेले नाहीत, त्यामुळे त्यांच्याविरोधात वॉरंट निघालं. ते तारखेवर हजर राहिले तर वॉरंट रद्द होतात. आमच्यावरही असे अनेक वॉरंट निघाले आहेत. अटक वॉरंट निघालं आणि त्यावर कोर्टात हजर राहिलं तर ते वॉरंट नंतर रद्द होतं. मनोज जरांगे यांनी केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मनोज जरांगे गेल्या वेळी माझ्या आईवर बोलले होते. नंतर त्यांनी माफी मागितली. उपोषणामुळे त्यांना त्रास झाला होता, त्यामुळे तसं वक्तव्य झालं असं ते म्हणाले होते. आताही उपोषणामुळे पुन्हा त्यांचा संताप झाला असेल. त्यामुळे त्यांनी अशी वक्तव्य केली असतील. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अनिल देशमुखांनी या आधीही आपल्यावर आरोप केले होते. मी आधी यावर बोललो नव्हतो. मी अशा प्रकारचं राजकारण कधीही करत नाही. मी कुणाच्या नादी लागत नाही आणि कुणी नादी लागलं तर सोडत नाही. मला देशमुखांना एकच सांगायचं आहे, त्यांच्याच पक्षाच्या काही नेत्यांनी माझ्याकडे काही ऑडिओ व्हिज्युअल्स दिलेत. त्यामध्ये अनिल देशमुख शरद पवार, उद्धव ठाकरे, सचिन वाझे यांच्याबद्दल काय म्हणत आहेत हे दिसतंय. रोज कुणी माझ्यावर आरोप करत असेल तर मी शांत बसणार नाही. वेळ आली तर त्या गोष्टी मला पब्लिक कराव्या लागतील. देवेंद्र फडणवीस पुराव्याशिवाय काही बोलत नाही, असा इशाराही त्यांनी देशमुख यांना दिला. उद्धव ठाकरे आणि अजित पवारांना अडकवण्यासाठी देवेंद्र फडणवीसांनी दबाव आणला होता असा आरोप अनिल देशमुखांनी केला आहे. त्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अनिल देशमुख यांच्यावर आरोप झाल्यानंतर राज्यात महाविकास आघाडी सरकार होतं. त्या प्रकरणी मुंबई हायकोर्टाच्या मुख्य न्यायाधीशांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. अनिल देशमुख त्यानंतर जेलमध्ये गेले. आताही ते बेलवर बाहेर आहेत. महाजनांवरमोक्कालावण्याचाडावहोता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आता सीबीआयने जी चार्जशीट दाखल केली आहे त्यामध्ये गिरीश महाजनांवर मोक्का लावण्यासाठी दबाव टाकण्यात येत होता असा आरोप करण्यात आला आहे. महाजनांवर खोटे गुन्हे दाखल करायला लावले याचे ऑडिओ व्हिज्युएल पुरावे आपण दिले होते. ते पुरावे सीबीआयने कोर्टात दाखल केले. महाविकास आघाडी सरकारने विरोधी आमदारांवर कशा प्रकारे मोक्का लावण्याचा प्रयत्न केला हे यावरून दिसतंय.



## आष्टी-पाटोदा-शिरुर विधानसभेतून आम आदमी पार्टीतर्फे आस्मान जरांगे पाटील निवडणुक लढवणार-विष्णुपंत गिरी, नारायण आघाव



बीड (प्रतिनिधी)- येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये आम आदमी पार्टीतर्फे जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदारसंघ असलेला आष्टी-पाटोदा-शिरुरच्या विधानसभेतून आस्मान जरांगे पाटील निवडणुक लढवणार असल्याची माहिती पक्षाचे शहराध्यक्ष विष्णुपंत गिरी, दहिवंडीचे सर्कलप्रमुख नारायण आघाव, दहिवंडीचे शाखा प्रमुख संजय आघाव, कोळवाडीचे शाखाप्रमुख अंबु जाधव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार आदी कामे पाहता देशामध्ये आम आदमी पार्टीची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत असून आम आदमी पार्टी हा पक्ष भ्रष्टाचारमुक्त राजकारण करत आहे त्यामुळे पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा हा अल्पावधीतच प्राप्त झाला आहे. अशातच महाराष्ट्र राज्यात राजकारणात बावळटगिरी, आमदार-खासदार विकत घेणे, पक्षफोडीची वृत्ती विकास कामात टक्केवारी खाणे यामुळे महाराष्ट्रातील राजकारण कीडयुक्त झाले आहे. त्यामुळे लागलेली कीड संपुष्टात आणण्यासाठी व शेतकऱ्यांचे, सुशिक्षित बेकारांचे, महीलांचे, कंत्राटी नौकर वर्गीयांचे कामे करण्यासाठी आम आदमी पार्टी राज्यातील सर्व 288 विधानसभा लढवणार आहे असेही पत्रकाद्वारे आम आदमी पार्टीकडून कळविण्यात आले आहे.

## परमेश्वर थोरात यांनी बीड मातीत अमेरिकन ॲवोकॅडाचे उत्पादन

**बीड प्रतिनिधी** - पाणीटंचाई अन डोंगराळ जमीन असतानाही बीड तालुक्यातील शिवनी येथील प्रगतशील शेतकरी परमेश्वर थोरात यांनी एका एकरात तब्बल पाच लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. या शेतकऱ्याने अमेरिकन ॲवोकॅडा या पिकाची लागवड केली.त्यांचे पाहून इतर 200 पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी या पिकाची लागवड केल्याचे सांगण्यात आले. ॲवोकॅडा फळाने बीपी ,शुगर,कॅन्सर,मोतीबिंदू ,त्वचारोग , केसगळती आजार नियंत्रित केले जातात .त्यामुळे फळाची मागणी वाढली असून महाराष्ट्रसह देशात ॲवोकॅडाची विक्री होत आहे. ॲवोकॅडा या फळाला प्रतिकिलो बाराशे रुपये भाव असल्याने दोन ते तीन फळांचेच बाराशे रुपये उत्पन्न मिळत आहे.



कमी पाण्यात लागवड होणारे बाराशे रुपये प्रतिकिलोचे इतर पिक नसल्याने शेतकरी याकडे आकर्षित होत आहेत. पारंपारिक पिके कापूस, तूर या पिकांना बाजूला करत तरुण शेतकरी ॲवोकॅडा पिकाकडे वळत आहेत. ॲवोकॅडा पिकाच्या यशस्वी प्रयोगानंतर कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी परमेश्वर थोरात यांना बोलावून त्यांचे कौतुक केले तसेच मी देखील एक एकरात या पिकाची लागवड करणार असल्याचे सांगितले. काल दिनांक 16 जुलै रोजी अशोक आढाव उपविभागीय कृषी अधिकारी वैजापूर ,डॉक्टर संजय पाटील प्रमुख शास्त्रज्ञ मोसंबी वैजापूर, अर्जुन चव्हाण कृषी पर्यवेक्षक बीड, दिलीप पाखरे कृषी अधिकारी वैजापूर यांनी भेट दिली व कौतुक केले. अवोकॅडोचे रोपे घेऊन ते लावगड करणार आहेत असेही सांगितले.

## कारगिल विजय दिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

जालना/असलम कुरेशी
शहीद सैनिकांच्या बलिदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी राज्यात २६ जुलै हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या वर्षी २५ वा कारगील विजय दिवस हा कारगिल विजय रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या दिवसाचे औचित्य साधून दि.२६ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता वन विभागाकडून प्राप्त फळ झाडांचे वृक्षारोपण करुन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथील सैनिकी संकूलावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबितांसह इतर नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. निलेश पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## सह्याद्री हॉस्पिटलचे बीड करांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

### न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर यांचा जिल्हावासीयांसाठी नवा पॅटर्न मेंदू,मनका व नस विकाराचे तपासणी शिबिर रविवारी आयोजित

(प्रतिनिधी बीड). बीड जिल्ह्यातील एकमेव डेडिकेटेड अस"न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर" यांचे "विश्व न्यूरोस्पाईन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल" च्या प्रयत्नाने पुणे येथील सुप्रसिद्ध "सह्याद्री हॉस्पिटल"येथील प्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ "सचिन डी महाजन" हे बीड करांच्या सेवेसाठी उपलब्ध राहणार आहेत. 28 जुलै 2024 रोजी रविवार सकाळी 10 ते 3 पर्यंत हे मेंदू मनका नस विकारांच तपासणी शिबिर सुरू राहणार आहे. तरीही जिल्ह्यातील सर्व संबंधित रुग्णांनी या तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन "विश्व हॉस्पिटल बीड"यांच्यातर्फे "न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर" यांनी केले आहे.





शिबिरामध्ये ब्रेन ट्यूमर,ब्रेन ट्यूमर ची पुनरावृत्ती, मेंदू व पाठीमागील गाठी, पाठीचा ट्यूमर टीबी ची गाठ,मणक्यातील सर्व समस्या परत येणे,डोके,मेंदू,मान किंवा मणक्याचे दुखापत,तुमच्या पाठीत किंवा माने तीव्र वेदना असणे,मनका कमकुवत होणे,अर्धांगवायूचा त्रास, मेंदूतील रक्तवाहिनी फुगणे, पाठीचा कणा संदर्भातील विकृती, मनके एकमेकांवर घसरणे,सरकलेली मणक्याची चकती,मेंदू संदर्भातील आणि मणक्या कोणत्याही समस्या.. या सर्व विकारावरील रुग्णांनी या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा. त्यासाठी रुग्णांनी अगोदर नाव नोंदणी करून घेणे गरजेचे आहे.

त्यासाठी 02442-295151, 8208952442, या दूरध्वनीवर संपर्क करण्याचे आवाहन "विश्व हॉस्पिटलच्या" वतीने करण्यात आले आहे. रुग्णांसाठी शिबिराचे ठिकाण. विश्व न्यूरो स्पाइन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिहॅबिलिटेशन सेंटर, मधुलिनी स्क्वेअर, शिवाजीनगर पोलिस स्टेशन जवळ, बार्शी रोड बीड शिबिरामध्ये सह्याद्री हॉस्पिटल चे न्यूरोसर्जन डॉ सचिन डी महाजन आणि "विश्व हॉस्पिटल चे प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर हे रुग्णांकरिता सेवा देणार आहेत. तरीही रुग्णांनी, जिल्हावासी यांनी शिबिरामध्ये नाव नोंदणी करून मोठ्या प्रमाणात या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## टॅक्स च्या बाबतीत महाराष्ट्र नंबर वन अर्थसंकल्पात महाराष्ट्राला गाजर:- किरण डावकर

बीड(प्रतिनिधी) महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसणारा अर्थसंकल्प देशाच्या एकूण जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा ३८ टक्के इतका आहे. परंतु केंद्र सरकारने महाराष्ट्राकडे दुर्लक्ष करून आंध्रप्रदेश, बिहार, उत्तराखंड, सिक्कीम, हैद्राबाद यांनाच विशेष प्राधान्य दिले आहे. ४.० इंडस्ट्रीजची वाटचाल असताना अर्थसंकल्प २.० कडे जात आहे. बिहारला सव्वीस हजार कोटी देत असताना महाराष्ट्राकडे लक्ष दिले नाही. उद्योगात होत असलेले परिवर्तन पाहता औद्योगिक वाढ ही १५ टक्क्यांच्या अनुपातात वाढ होणे गरजेचे आहे. सध्या ही साडे नऊ टक्के आहे. तंत्रशिक्षण आणि खेळते भांडवल यावर योजना जाहीर होणे महत्त्वाचे होते. महाराष्ट्रामध्ये गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होत असते, त्यामानाने मूलभूत सुविधांसाठी राखीव निधी देणे गरजेचे होते.



जीएसटी स्लॅबमध्ये कोणताही बदल दिसून येत नाही. स्टार्टअप उद्योगाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे होते. स्टार्टअप उद्योगांना जुन्याच योजना आहेत. महाराष्ट्राचा देशाच्या एकूण विकासात सर्वात मोठा वाटा असतानाही महाराष्ट्राला जास्त सुविधा दिल्या गेल्या नाहीत. राजकीय अस्थिरतेचा मोठा परिणाम अर्थसंकल्पावर दिसून येत आहे. महिला स्टार्टअप उद्योगांना नवीन कोणतीच योजना राबविण्यात आली नाही. आहे त्या योजना व्यवस्थित रित्या राबविल्या जात नाहीत. महिला उद्योगांना स्पेशली क्लस्टर निर्मिती चालना देणे गरजेचे होते परंतु महिला उद्योगाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे असं मत सामाजिक कार्यकर्ते किरण डावकर यांनी व्यक्त केल आहे

# ट्रान्सपोर्ट रोडमुळे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूल बनतोय चिखलमय! सार्वजनिक बांधकाम विभागाने मार्गावरील खड्डे त्वरित दुरुस्त करावेत !

### मुख्याधिकारी साहेब लक्ष कधी देणार – ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ/प्रतिनिधी
परळी येथील ट्रान्सपोर्ट रोडमुळे डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावर येणाऱ्या वाहतुकीच्या वाहनांमुळे हा मार्ग चिखलमय झाला आहे. याचा तेथील नागरिकांना त्रास भोगावा लागत असून वाहतूकदारांना सुद्धा अडचणीचा सामना करावा लागत आहे. नागरिकांची या त्रासातून सुटका व्हावी तसेच पुलावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुरुस्त करावे आणि मंजूर झालेल्या ट्रान्सपोर्ट रोडचे काम त्वरित सुरू करावे अशी मागणी नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि सार्वजनिक विभागाचे मुख्य अभियंता यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

रेल्वे उड्डाणपूल ला खालील ट्रान्सपोर्ट रोड वरून मालाची वाहतूक करणारी जड वाहने ब्रिजवरून जात असतात. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे आणि त्या रोडवर चिखल साचल्यामुळे त्या वाहनांच्या चाकांना माती लागल्यामुळे सर्वत्र चिखल पसरला आहे त्याचा परिणाम म्हणून वाहनधारक तेथे त्यांचे एक्सीडेंट होत आहेत. पायी चालणारे हे सुद्धा या चिखलात घसरून पडत असल्यामुळे त्यांना मणक्याचे त्रास होत आहेत. या



प्रकरणांमध्ये नगरपालिकेचे मुख्य अधिकारी श्री त्रिंबक कांबळे हे जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत असे नागरिक बोलत आहेत.

परळी वैजनाथ हे ज्योतिर्लिंगाचे ठिकाण असून येथे दर्शनासाठी राज्यभरातून तसेच बाहेरच्या राज्यातून नागरिक येतात येणाऱ्या नागरिकांना परळी वैद्यनाथाचे नवल असते मात्र शहराचे मार्ग पाहिल्यास त्यांची निराशा होते. त्यामुळे उड्डाण पुलावडील मार्गावर पडलेले खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने पवित्र श्रावण महिन्याच्या अगोदर दुरुस्त करावेत अशी मागणी सार्वजनिक खात्याकडे त्यांनी केली आहे
या रोडवर सर्वत्र खड्डे पडले असून या खड्ड्यांमध्ये पाणी साचले आहे. पाणी साचल्यामुळे तेथील नागरिकांना रहदारीसाठी त्रास आणि अडचण भोगावी लागत आहे. मालवाहतूक करणारी जड वाहने अंबाजोगाईकडे जातात किंवा परभणी रोड बीड रोड या रोडवर ही वाहतूक मोठ्या प्रमाणावर आहे. नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क केला असता त्यांच्याकडून अपेक्षित उत्तर मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत त्यामुळे जाणून बुजून दुर्लक्ष करणारे मुख्याधिकारी यांना सामान्य जनता माफ करणार नाही. या प्रकरणी परळीचे तहसीलदार तसेच नायब तहसीलदार श्री. रुपनर साहेब यांच्याकडे पाठपुरावा केला आहे तरी या गंभीर विषयाची त्यांनी दखल घ्यावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी बीड शिवसैनिकांनी आवळली वज्रमूठ!

## शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख सविता किंवांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महिला आघाडीची जिल्हा बैठक संपन्न

## शिवसेना शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे यांनी बीड शहर पदाधिकाऱ्यांची घेतली बैठक

**बीड/प्रतिनिधि**

विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. यादरम्यानच राज्यासह प्रत्येक जिल्ह्यातील उमेदवार आपापल्या मतदार संघात निवडणुकीसाठी कंबर कसत असून मतदारांची बांधणी मोठ्या ताकदीने करत आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांच्या सूचना मार्गदर्शनाखाली काल दि. २३ जुलै रोजी दुपारी ०१.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख सविता किंवांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेना महिला आघाडी जिल्हा बैठक संपन्न झाली तर शिवसेना शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे यांनी बीड शहराचे पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या दोन्ही बैठकीमध्ये बीड विधानसभा निवडणुकीची रणनीती तयार करण्यात आली असून महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष तथा लाडके मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी शिवसैनिकांनी वज्रमुठ आवळली आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेब हे अहोरात्र गोरगरीब, शेतकरी तथा सर्वसामान्यांसाठी कष्ट घेत असून राज्यातील जनतेच्या हिताच्या योजना आमलात आणत



आहेत. मुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने सामान्य जनतेचे मन जिंकले आहे. यामुळे आगामी काळातही शिंदे सरकार सत्तेत आणण्यासाठी शिवसैनिकांनी निश्चय केला असून सर्व शिवसैनिक कामाला लागले आहेत.

वर्षानुवर्षांपासून बीड मतदार संघाची जागा ही शिवसेनेला सुटत आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी सलग चाळीस वर्ष बीडवासियांची सेवा केली आहे. जनसेवेचा एक तप त्यांनी पूर्ण केला आहे. सध्याच्या तिथील अवघ्या मतदार संघातून यंदा अनिलदादांना आमदार करूयात अशी प्रतिक्रिया उमठत आहे. अशा परिस्थितीत विधानसभेला अनिलदादा जगताप यांनाच संधी द्यावी, याकरिता बीड जिल्हा महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्या तथा बीड मतदार संघातील शिवसेना पदाधिकारी मुंबई येथे मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या भेटीला जाणार आहेत. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख सविता किंवांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडलेल्या शिवसेना महिला आघाडी जिल्हा बैठकीत जिल्हाप्रमुख रत्नमाला आंधळे, सहसंपर्कप्रमुख सुमन गोरे, सचिव शकुंतला गोगाशे, पाटोदा तालुकाप्रमुख मनीषा रामपुरे, गेवराई तालुकाप्रमुख गंगा खेवणे, गेवराई सर्कल शितल पुंडुरे, बीड तालुका प्रमुख मंगल गायकवाड, उप तालुकाप्रमुख वैशाली घोंगडे, शहर प्रमुख सुरेखा परसे, उपशहर प्रमुख ऊज्वला खरात, उपतालुकाप्रमुख गेवराई मनीषा जाधव आणि उप सर्कल गेवराई सुरेखा पोहे यांची उपस्थिती होती. याबरोबरच शिवसेना शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे यांनी बीड शहर पदाधिकाऱ्यांच्या घेतलेल्या बैठकीत शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे , हनुमानप्रसाद पांडे, नवनाथ शिंदे, आकाश वाघमारे, आबासाहेब जाधव, अनिकेत नाटकर व आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखेकडून 52 वा वर्धापन दिन साजरा



बीड/प्रतिनिधमहाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ही शिक्षक बांधवांच्या न्याय हक्कासाठी लढणारी एक संघटना आहे .आज महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा बीड कडून शिक्षक समितीच्या ५२ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यानिमित्त जिव्हाळा शहरी बेघर केंद्र बीड येथे आज महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या पदाधिकारी व शिक्षक बांधवाकडून जिव्हाळा केंद्रातील बेघर लोकांना फळांचे वाटप करण्यात आले यावेळी जिल्हाध्यक्ष महेश सातपुते यांनी शिक्षक समितीची माहिती सर्वांना दिली त्याचप्रमाणे पाटोदा तालुक्यामध्ये वर्धापन दिनानिमित्त पाटोदा तालुका अध्यक्ष भाऊसाहेब बांगर यांच्याकडून वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी राजेंद्र खेडकर सर, दिलीप खाडे सर,महेश सातपुते,सुरेंद्र गोल्हार,सानप एस. के,जी. डी.सानप,भाऊसाहेब बांगर,राहुल उंडाळे,उमेश सानप व योगेश सोळसे इत्यादी समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मोबाईल चोरीच्या संशयावरुन तीन संशयित महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले

## पोलिसांनी चोरीला गेलेला मोबाईल संशयित महीले कडून केला हस्तगत

**केज/प्रतिनिधी**

आठवडी बाजारात बाजार करीत असलेल्या एका महिलेचा मोबाईल चोरीला गेला होता. त्या प्रकरणी माहिती मिळताच पोलीसानी तीन संशयित महिलांना ताब्यात घेत त्यांच्याकडून चोरीला गेलेला मोबाईल हस्तगत केला. या बाबतची माहिती अशी की, दि. २३ जुलै मंगळवार रोजी के ज येथील आठवडी बाजारात श्रीमती फरिदा सय्यद या त्यांच्या नातेवाईका सोबत बाजारात भाजीपाला खरेदी करीत असताना त्या ठिकाणी गर्दी करून उभ्या असलेल्या दोन अनोळखी महिलांनी त्यांच्या पिशवीतील रेडमी कंपनीचा मोबाईल चोरला. फरीदा सय्यद यांना त्यांचा मोबाईल चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी केज पोलीस ठाण्यात हजर होवून मोबाईल चोरीची माहिती दिली. सदर मोबाईल चोरी संदर्भात पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील आणि पोलीस नाईक प्रकाश मुंडे यांनी बाजारात जावून शोध घेतला असता त्यांना तीन संशयित महीला आधळून आल्या. पोलिसांनी त्या संशयित महिलांना पोलीस ठाण्यात आणून महिला पोलीस कर्मचाऱ्या मार्फत त्यांची रीतसर झडती घेतली असता एका संशयित महिलेने तिच्या साडीमध्ये चोरी गेलेला मोबाईल लपवून ठेवल्याचे निदर्शनास आले. फरीदा सय्यद यांच्या तक्रारी वरून चंदाबाई उत्तम शिंदे, आक्काबाई भाऊराव शिंदे आणि ललीता बबन काळे या धाराशिव जिल्ह्यातील ढोकी येथील रहिवाशी असलेल्या तिघी विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु. र. नं. ३१०/३०२४ भा. न्या. सं. ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस जमादार श्रीकांत चौधरी हे तपास करीत आहेत. दरम्यान मोबाईल चोरी प्रकरणी तिघींना न्यायालयात हजर केले असता संशयित ललिता काळे हिच्या सोबत लहान मुल असल्यामुळे तिला जामीन मंजूर केला आहे. तर चंदाबाई उत्तम शिंदे व आक्काबाई भाऊराव शिंदे या दोघींना न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## काँग्रेसच्या जिल्हा सरचिटणीस पदी माजी सरपंच आजम पाशा यांची निवड

नेकनूर च्या एकनिष्ठ कार्यकर्त्याची बीड जिल्हा सरचिटणीस पदी माजी सरपंच आजम पाशा यांची निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षा होत आहे. काँग्रेस पक्षाला येणाऱ्या काळात बळकटी देण्यासाठी सदैव तत्पर राहन काम करण्याची संधी मला दिली त्या संधीचं सोन मी नक्कीच करणार आहे असे मत आजम पाशा यांनी पत्रकारांशी




बोलताना व्यक्त केले. गेल्या तीन पिढ्यापासून काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहणारे आजम पाशा यांच्या परिवारावर विश्वास ठेवून काँग्रेस पक्षाने जिल्हा सरचिटणीस पद देऊन खरोखरच एकनिष्ठ कार्यकर्त्यांना काँग्रेस पक्ष न्याय देत आहे याचे ज्वलंत उदाहरण आजम पाशा च्या माध्यमातून दिल्याने बीड जिल्ह्यांमध्ये आजमभाई यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. माजी आमदार साठे साहेब, जिल्हा परिषद सदस्य सुरेश तात्या काँग्रेस, समाजसेवक जफर पाशा जागीरदार, मुजम्मिल जागीरदार, शेख आदाम शेख मुसा, शेख सोनू, शेख अलाउद्दीन व इतर गावाकडून नेकनूर वतीने सत्कार करण्यात आला आहे

## नाशिक-गंगापूर धरण साठ्यात पाच टक्क्यांनी वाढ



जिल्ह्यात दोन दिवसापासून सतत धार पाऊस सुरू असल्यामुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात सुमारे पाच टक्क्यांनी वाढ झाली आहे. गंगापूर धरणात दोन दिवसांपूर्वी 33 टक्के साठा होता. आता तो 38 टक्के साठा असल्याचे जलसंपदा विभागाने म्हटले आहे. त्यामुळे गंगापूर मध्ये सरासरी पाच टक्क्यांनी वाढ झाल्याचे बोलले जाते. या पावसामुळे शेतकऱ्यांना तर दिलासा मिळालाच आहे, शिवाय खरीप हंगामाला सुद्धा जीवदान मिळाले आहे. दुष्काळग्रस्त भाग येवला, नांदगाव, मालेगाव, या तालुक्यामध्ये अजूनही समाधानकारक पाऊस पडलेला नाही. पुढील २४ तासात घाट माथ्यावरील भागासाठी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तसेच शहरात दिवसभर रिपरिप सुरू आहे.

# विलेपार्ले पूर्व येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या दुर्वेश देवरुखकर ची राष्ट्रीय स्पर्धेत निवड



**मुंबई/प्रतिनिधी**

प्रबोधनकार क्रीडा संकुलातील जलतरणपटू दुर्वेश देवरुखकर याने नुकत्याच पुणे येथील टिळक टँक येथे राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये ग्रुप ३ मध्ये सहभागी होऊन तीन रौप्य व एक कांस्य पदके पटकावले. त्याची पहिल्यांदाच राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाली असून तेही तब्बल तीन प्रकारात (१०० मी बटरफ्लाय, १०० मी ब्रेस्टस्टोक व २०० मी इंडिव्हिज्युअल मीडलि ) दुर्वेश हा प्रबोधनकार क्रीडा संकुलाचे माजी महापौर रमेश प्रभू यांच्या आशीर्वादाने तसेच संकुलाचे अध्यक्ष अरविंद प्रभू व सचिव डॉ. मोहन राणे यांच्या मार्गदर्शनाने वयाच्या चार वर्षापासून जलतरणाचा सराव करत आहे. त्याने आतापर्यंत बऱ्याच जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये नवीन विक्रम करून वैयक्तिक विजेतेपद पटकावले आहे. दुर्वेशी मोठी बहीण सिया हिला सुद्धा या स्पर्धेत ८०० मी फ्री स्टाईल मध्ये कांस्य पदक मिळविले आहे तसेच ती स्वतः या आधी चार वेळा राष्ट्रीय स्पर्धा खेळून पदक विजेती ठरली आहे. नील जेटली, सावली पाटील व अर्चित परब या संकुलाच्या खेळाडूंनी सुद्धा रिले शर्यतीत सुवर्ण पदक पटकाविले आहे. सर्व खेळाडूंच्या यशापाठी संकुलाचे प्रमुख प्रशिक्षक सहदेव नेवाळकर यांचा देखील मोलाचा वाटा आहे. दुर्वेश आता ६ ते ११ ऑगस्ट रोजी भुवनेश्वर ओडीसा येथे होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत पोहण्याच्या तीन प्रकारात सहभागी होणार आहे. हा पार्ले टिळक विद्यालय इंग्लिश मीडियम मध्ये इयत्ता सहावीत शिकत आहे. रोज सकाळी दोन आणि सायंकाळी तीन असा एकूण पाच तासांचा त्याचा रोजचा सराव करत असतो व त्याचबरोबर तो त्याचा अभ्यास देखील खूप चांगल्या प्रकारे सांभाळतो. दुर्वेश ची आई इशा देवरुखकर आंतरराष्ट्रीय मल्लखांब पंच आहे आणि वडील गणेश देवरुखकर हे मल्लखांबातील द्रोणाचार्य पुरस्कार विजेते आहेत. या दोघांच्या अनुभवाचा देखील दोन्ही बहिण भावाला वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असते. सर्वत्र त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मनसेचा दणका: जिल्हा शल्यचिकित्सक बडे यांच्याकडून खासगी डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅबवाल्यांना नोटीस

# ७ दिवसात लेखी अहवाल सादर न केल्यास कार्यवाही करण्याचे बजावले आदेश

बीड (प्रतिनिधी)- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शहरातील खासगी हॉस्पीटलमध्ये व स्वतंत्र पॅथॉलॉजी लॅबमध्ये प्रत्यक्ष जावून स्टिंग ऑपरेशन केले असता अव्वाच्या-सव्वा दरामध्ये आमच्याकडेच तपासण्या होतात तसेच बाहेरचे रिपोर्ट ग्राह्य धरले जाणार नाहीत आमच्याकडेच तपासण्या करा असा दम दिला जातो. तसेच सर्व पॅथॉलॉजी लॅबचा आढावा घेवून संबंधित लॅब चालक आवश्यक प्रमाणपत्र न घेता लॅब चालवत आहे का व त्या लॅबचालकाची लॅब चालवण्याची पात्रता व तिथे काम करणारे टेक्नीशियन यांचे शिक्षण पुर्ण आहे का? ह्या गोष्टी व तो लॅब चालक कट प्रॅक्टीस करुन नागरिकांची लुट तर करत नाही ना ? याची चौकशी करावी व सर्व नियमांचे पालन होत आहे का याचा आढावा घेण्यात यावा अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली होती अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शहराध्यक्ष करण लोंढे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष ऋषीकेश गिराम पाटील यांच्या वतीने देण्यात आला होता याची दखल घेवून जिल्हा शल्यचिकित्सक बडे यांच्याकडून खासगी डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅबवाल्यांना नोटीस देण्यात आली आहे. याबाबत माहिती अशी की, मनसेकडून शहरातील खासगी डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅब येथे जावून रक्त तपासणी तसेच सोनोग्राफीच्या ट्रिटमेंटची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली होती त्यात त्यांना आढळून आले की, डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅबवाले मनमानी करतात त्यामुळे त्यांनी जिल्हाशल्यचिकित्सक यांना भेट देवून मागणी केली तसेच मागील दोन दिवसांपासून देखील मनसेकडून आढावा घेणे सुरु आहे त्यात देखील असे आढळून आले कि अजून पर्यंत बऱ्याच लॅब मध्ये 11वी -12 वी चे मुलं आणि जयनाचे शिक्षण सुरु आहे असे मुलं कोणत्याही प्रकारच प्रमाणपत्र नसतांना रुग्णांचे रक्त नमुने घेतात ही अत्यंत भयानक वास्तविकता आहे. चक्क नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार फक्त स्वतः च्या फायद्यासाठी डॉक्टरांच्या संगणमातांणे सुरु आहे. तसेच शहरातील पल्स हॉस्पिटल येथील शरद नाईकनवरे या लॅब चालकाने उडवा-उडवीचे उत्तर दिले येथे असलेल्या सुनील वाघमारे यांना कमिशन सुरु आहे का? या लॅब वाल्याकडून असा सवाल उपस्थित केला जातोय आणि अश्याच प्रकारे अनेक प्रकारचे उत्तर वेगवेगळे लॅब वाले देत आहेत ते सर्व पुरावे संबंधित अधिकाऱ्यांकडे मनसेकडून सुपूर्द केले गेले आहेत.तसेच तुळजाई चौक येथील सुनिल शिंदे यांची साईकृपा लॅब असलेल्या ठिकाणी मनसे पदाधिकारी गेले असता तेथे त्यांनी गावचे सरपंच बोलवून घेतात ओळखी काढून चहा पाण्यावर मिटवून घ्या अश्या प्रकारचे मत मांडतात स्वतः च्या चुका दुसऱ्याला दोषी ठरवून त्यावर आरोप करतात लॅब असोसिएशन चे काही पदाधिकारी मनसे पदाधिकाऱ्यांना उडवा-उडवी चे उत्तर देतात आणि सांगतात की आम्ही सुद्धा राजकारणी आहोत आमचे संबंध आहेत आमची संघटना आहे आता जर का या संघटना अनधिकृत कृत्य करण्यास पाठपुरावा करत असेल तर मग या संघटना मॅनेज होणाऱ्या आहेत का? अश्या कोणत्या संघटना आहेत यांचा लोकउपयोगी कार्यास विरोध करत आहेत चक्क प्रमापत्र मागितल्यानंतर ज्या महाविद्यालयाचे प्रमाणपत्र आहेत त्या महाविद्यालयचे प्राध्यापक येऊन होत असलेल्या प्रकारास दाबण्याचा प्रकार करत असल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला आहे. तसेच 15-20 हजार रुपये घेऊन डीएमएलटी कोर्स चे प्रमाणपत्र मान्यता नसलेल्या संस्थाचे दिले जाते आणि एकही दिवस संस्थेमध्ये क्लास होत नाहीत असे बोगस प्रमाणपत्र देऊन अनधिकृत लॅब चालवण्यास सहाय्य करतात यांच्यावर देखील कार्यवाही व्हावी अशी मागणी मनसेकडून करण्यात आली आहे.

## ओबीसी योद्धा लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांचे पाटोद्यात जंगी स्वागत



स्थानिक आमदार ओबीसी आरक्षणावर का बोलत नाहीत त्यांना जॉब विचारा- प्रा.हाके

पाटोदा (प्रतिनिधी) ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनाचे प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे हे आज पाटोदा शहरात आले असता त्यांचे ओबीसी बांधवांनी जंगी स्वागत केले यावेळी दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. प्रा. लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे मागील दोन दिवसांपासून जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. ते यातून संवाद साधत ओबीसी बांधवांमध्ये जनजागृती करत आहेत त्यांच्या आगमना निमित्त ठिकठिकाणी रॅली,संवाद सभा आयोजित करण्यात येत आहे. आज बुधवारी दिनांक २४ रोजी प्रा. लक्ष्मण हाके,नवनाथ वाघमारे यांचे पाटोदा शहरात आगमन झाले. यावेळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ओबीसी बांधवांनी त्यांचे जंगी स्वागत केले यावेळी प्रा. हाके यांनी समाज बांधवांशी संवाद साधला यावेळी ओबीसी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती यावेळी प्राध्यापक हाके बोलताना म्हटले आपले स्थानिक आमदार ओबीसी आरक्षणावर का बोलत नाहीत त्यांना जॉब विचारा यावेळी ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## प्रदीप सावळे यांची चेअरमन पदी निवड

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : धनंज ता.लोहा येथील सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत भरघोस मतांनी निवडून आलेल्या धनंज (खु) धनंज (बु) गोळेगाव, पिंपळदरी, भूकमारी या गट सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी प्रदीप पाटील सावळे तर संचालक मंडळात हरिनाम कदम, रावसाहेब घाटोळ,मधुकर घाटोळ,बाबुराव कपाळे, काशिनाथ ढाले,राजाराम कानगुले,सुभाष पाटील शिंदे, साधू भुरे,मनोहर जाधव,खंडू सावळे सौ.सविता व्यंकटराव सावळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.



निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री.गायकवाड श्री.जाधव यांनी काम पाहिले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव पाटील सावळे, सुभाषराव गायकवाड,संभाजी पाटील घाटोळ,श्रीनिवास सावळे, पांडुरंग सावळे,माधवराव घाटोळ, शिवाजी घाटोळ,पंडित पाटील कदम,बालाजी पाटील सावळे,व्यंकटराव सावळे, मोहन विभुते, गणेश डांगे,भास्कर सावळे,मारोती कुदळकर अमोल सावळे हणमंत सावळे यांच्यासह पॅनलचे सर्व सदस्य व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# विष्णुपुरी प्रकल्प ८० टक्के भरला नांदेडकरांचा पाण्याचा प्रश्न मिटला जिल्ह्यात एकूण ३७२.३० मिलिमीटर पावसाची नोंद

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : शहरासाठी व काही ग्रामीण भागाच्या सिंचनासाठी वरदान ठरणारा विष्णुपुरी प्रकल्प बुधवारी सकाळी ८० टक्क्यावर गेला असल्याची माहिती पाटबंधारे विभागाकडून देण्यात आली. नांदेड जिल्ह्यात २४ -जुलै रोजी सकाळी संपलेल्या गत २४ तासात सरासरी १० मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून जिल्ह्यात एकुण ३७२.३० मिलीमीटर पाऊस झाला आहे. जिल्ह्यात बुधवार २४-जुलै रोजी सकाळी संपलेल्या गत २४ तासात झालेला



पाऊस मिली मीटरमध्ये तालुकानिहाय पुढील प्रमाणे, कंसात एकूण पाऊस : नांदेड- ९.७० (३४५.९०), बिलोली- ८.२० (४१७.१०), मुखेड- ३.६० (४१२.३०), कंधार-२ (३८३.१०), लोहा- ५.७० (३७१.८०), हदगाव-११.७० (३००.७०), भोकर-१९.१० (३३२.१०), देगलूर-४.२० (३२५.९०), किनवट- १६.६० (४८०.१०), मुदखेड १५.६० (३९७.१०), हिमायतनगर-१२.७० (३४१.९०), माहूर- १० (३५९.४०), धर्माबाद- १२.७० (४४२), उमरी- १४.६० (३१६.२०), अर्धापूर- १९ (४२०), नायगाव-९.९० (२६७.७०) मिलीमीटर आहे.तर जिल्ह्यात एकूण ३७२.३० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. नांदेडकरांची तहान भागवणाऱ्या विष्णुपुरी प्रकल्प ऐन उन्हाळ्यात तळाला गेला होता. त्यानंतरही आजपर्यंत नांदेड जिल्ह्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने नांदेडकरांना पाण्याची टंचाई भासेल अशी चिंता व्यक्त केली जात असतांना विष्णुपुरीच्या जलाशयात झालेल्या दमदार पावसामुळे विष्णुपुरी प्रकल्प भरावयास सुरुवात झाली आहे. मागील दोन दिवसांपासून विष्णुपुरीच्या धरण क्षेत्रात येणाऱ्या गावांमध्ये जोरदार पावसाचे आगमन झाले आहे. यामुळे विष्णुपुरी प्रकल्पात येणाऱ्या पाण्याचा येवा वाढला आहे. बुधवारी सकाळी ७ वाजेपर्यंत या प्रकल्पात ७७ टक्क्याच्या आसपास पाणी जमा झाले असल्याचे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले. विष्णुपुरी प्रकल्पाच्या खालील गोदावरी पात्रा शेजारील गावाना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पाण्याचा येवा वाढल्यास विष्णुपुरी प्रकल्पाचे एक ते दोन दरवाजे उघडले जातील अशी चर्चा येथे कार्यरत कर्मचाऱ्यांमध्ये होती. एकंदर नांदेड जिल्ह्यासह शहरात पाण्याची अपेक्षेपेक्षा कमी पाऊस पडला असला तरी विष्णुपुरी प्रकल्प तुडूंब भरण्याच्या मार्गावर असल्याचे सांगण्यात आले.

## महिलांनी छोट्या मोठ्या उद्योगातून आपले कुटूंब आर्थिक सक्षम करावे-नेहाताई क्षीरसागर



मांजरसुंबा/प्रतिनिधी

हिंद संस्था नेकनूर यांनी अफार्म पुणे आणि उषा शिलाई मशिन स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने मांजरसुंबा येथे महिला मेळावा व शिलाई मशिन प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून नेहाताई यांनी मनोगत व्यक्त केले की, ग्रामीण भागातील महिलांनी छोट्या मोठ्या उद्योगातून आपले कुटूंब आर्थिक सक्षम करावे तसेच आपल्या गावातील इतर महिलांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. ज्या प्रमाणे आपण एका शिलाई मशिनच्या माध्यमातून महिन्याला ५ ते ८ हजार रुपये मिळवलेले आहेत. त्याचप्रमाणे आपण सर्व प्रशिक्षित महिलांनी एकत्रित येवून एखादी कंपनी उभा केली तर चांगला रोजगार निर्माण होईल आणि स्थलांतर कमी होईल. आपण शिकुन घरी न बसता मोठ्या धाडसाने पुढे येवून कुटुंबाला हातभार लावत आहात असे कौतुक महिलांचे केले. हिंद संस्थेचे महिला सक्षमिकरण, शेतकरी, शेती आणि पाणी या विषयातील कामचे सुध्दा कौतुक केले. तसेच नेहाताईंच्या हस्ते प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. मनीषा पवार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचलन संजय शिंदे, सचिव, हिंद संस्था यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुणकाका रसाळ, सरपंच मांजरसूंबा, विद्या जाधव, सारिका राऊत, प्रशिक्षिका, कल्याण अण्णा शिंदे, संदीपान मस्के, लक्ष्मण जाधव, युवराज शिंदे, विनायक इंगळे, राजू ढवळशंक, सुलेमान शेख आणि मांजरसुंबा, सासेवाडी, गवारी, येथून १२६ महिला उपस्थित होत्या.

# पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेचे अध्यक्षपदी डॉ. सुभाष जोशी यांची निवड.

**नायगाव /प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अग्रगण्य असलेल्या बीड येथील पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. अरूण गोविंदराव निरंतर यांनी स्वेच्छेने अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यामुळे बँकेच्या अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत बीड शहरातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. सुभाष जोशी यांची बँकेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. बँकेच्या नुतन अध्यक्षपदाच्या निवडीसाठी दि. 24.07.2024 रोजी बँकेच्या संचालक मंडळाची सभा मा. श्री समृत जाधव, अध्यासी अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली यावेळी संचालक मंडळातील सर्व संचालक उपस्थित होते. याप्रसंगी बँकेचे संचालक डॉ. पालवणकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले की, पूर्णवादी बँकेचे नूतन अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी या पदासाठी अत्यंत सक्षम असे व्यक्तिमत्व असून मा. डॉ. निरंतर यांच्या कुशल नेतृत्वाखाली विकसित झालेल्या पूर्णवादी बँकेची धुरा ते ताकदीने सांभाळतील. बँकेचे उपाध्यक्ष डॉ लक्ष्मीकांतराव पारनेरकर यांनी देखील बँकेच्या नवनिर्वाचित अध्यक्षांना शुभेच्छा देताना येणा-या काळात सर्व संचालकांच्या साथीने दोघे मिळून बँकेच्या प्रगतीसाठी कटिबद्ध



राहून बँकेच्या विकासाचा आलेख आणखी उंचावूत असे मत प्रदर्शित केले. तदनंतर बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आदरणीय दादांनी ज्या तळमळीने व मातृभावाने बँक नावारूपाला आणली त्याच धर्तीवर त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तेवढ्याच तळमळीने, समर्पित भाव ठेवून व निस्वार्थपणे बँकेला नवीन उंचीवर घेवून जाण्याचा माझा मानस आहे. यासाठी बँकेचे उपाध्यक्ष डॉ लक्ष्मीकांतराव पारनेरकर, जेष्ठ संचालक श्री. चंद्रकांतजी सानप, श्री सुहासराव तेंडूलकर, श्री माणूसमारे काका, ॲड. अमित देशपांडे, तसेच सर्व संचालक मंडळातील सदस्य व तज्ञ संचालक सी. ए गोपालजी कासट व सी. ए. नितीनजी करमाळकर तसेच बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सी.ए. एस. पी. लड्डा व अन्य सदस्य यांचे मला निश्चितच सहकार्य लाभेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. तसेच येत्या 2025 साला अखेर बँकेचा एकूण व्यवसाय रू. 2025 कोटी पर्यंत नेण्याचा मानस असून बँकेला मा. रिजर्व्ह बँकेच्या निकषानुसार बँक FSWM ( financially sound and well managed bank) च्या निकषास निश्चीतच पात्र ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. समाजातील उपेक्षित व कष्टकरी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी सध्या बँकेमार्फत बचत गट कर्ज योजनेच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे, येणा-या काळात या योजनेची व्याप्ती वाढविण्याची त्यांची इच्छा त्यांनी यावेळी सभागृहांसमोर समोर व्यक्त केली. तसेच बँकेचे मावळते अध्यक्ष डॉ. अरुण निरंतर मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, मी जरी माझ्या वाढत्या वयोमानामुळे स्वेच्छेने अध्यक्षपद सोडत असलो तरी मी बँकेसाठी संचालक म्हणून सदैव आपणा बरोबर उपलब्ध असणार आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांना त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या व बँकेशी निगडीत असणा-या सर्व सभासद, ग्राहक , कर्मचारी व संचालक मंडळातील आजी माजी सदस्यांनी माझे कार्यकाळात बँकेचा अध्यक्ष म्हणून जो विश्वास टाकला व मला जे भरभरून प्रेम दिले या बद्दल सर्वांचे कृतज्ञापूर्वक आभार मानले. याप्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राजेश कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रल्हाद राजुरीकर, सरव्यवस्थापक महेश पारगावकर, मुख्य हिशोबनीस अविनाश हिंगनीकर हे उपस्थित होते.

# माझ्या शरीराला धोका ? ; जरांगे यांनी स्वत: काय केला दावा ?



मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आक्रमक पावित्रा घेतलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले आहे. गावातील ज्या महिलांवर पोलिसांनी लाठीमार केला, त्यांच्या हस्ते हे उपोषण सोडणार असल्याची घोषणा जरांगे पाटील यांनी केली. यानंतर जरांगे पाटील यांनी फळाचा रस प्राशन करत उपोषण सोडले. यानंतर घेतलेल्या एका पत्रकार परिषदेवेळी जरांगे पाटील यांनी माझ्या शरीराला धोका झाल्याचा मोठा दावा केला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी उषोषण सोडल्यानंतर 'टीव्ही 9 मराठी'शी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, "सलाईन घेऊन उपोषण करण्यापेक्षा ते न केलेलं चांगलं. माझ्या उपोषणामुळे समाजाला न्याय मिळेल, हा माझा उद्देश होता. या उपोषणामुळे गरीब मुलांना जात वैधता प्रमाणपत्रासाठी वेळ वाढवून मिळाला. आता मी येत्या 13 ऑगस्टपर्यंत सरकारला वेळ दिली आहे. तोपर्यंत त्यांनी आमच्या सर्व मागण्या मान्य कराव्यात. मला सलाईन लावून उपोषण करायला आवडत नाही. त्यापेक्षा ते सोडलेलं बरं म्हणून मी उपोषण स्थगित केले." 7 ऑगस्टपासून 13 ऑगस्टपर्यंत पुन्हा दौरा करणार दरम्यान मनोज जरांगे पाटील हे गेल्या पाच दिवसांपासून अंतरवाली सराटी या ठिकाणी उपोषण करत होते. पाचव्या दिवशी जरांगे पाटील यांची तब्येत खालवली. त्यानंतर त्यांना सलाईन लावण्यात आली. यानंतर त्यांनी हे उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला. उपोषण संपल्यानंतर आता पुन्हा एकदा ते राज्यात दौरा सुरु करणार आहे. ही घरी बसायची वेळ नाही. येत्या 7 ऑगस्टपासून 13 ऑगस्टपर्यंत पुन्हा राज्यात दौरा करणार असे जरांगे पाटील यांनी म्हटले.

## शरीराला धोका असल्याचे डॉक्टरांनी सांगितले"

"माझे उपोषण व्यवस्थित सुरु होते. मात्र काल रात्री माझी तब्येत बिघडली. माझी शुगर कमी झाली. त्यावेळी डॉक्टरांनी माझी तपासणी केली आणि मला शरीराला धोका आहे, असे सांगितले. त्यानंतर मला अनेक कार्यकर्त्यांनी उपोषण सोडण्याची मागणी केली. मी त्यांचे ऐकत नसल्याने मला 20, 30 जणांनी दाबले आणि जबरदस्ती सलाईन लावले. यावेळी कार्यकर्त्यांसह समाजाचे असं म्हणणं होतं की, आपल्याला आरक्षण उशिरा भेटेल, पण आम्हाला तुम्ही पाहिजेत. तुम्ही आम्हाला पाडायचे सांगा, तुम्ही सांगितले तर आम्ही बापाला पाडतो. मग ते भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, कॉंग्रेस किंवा इतर कोणीही असतो", असे जरांगे पाटील म्हणाले.

# शिवसेना उबाठा गटाच्या २४ पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल.

नाशिक/सुरेश इंगळे. इगतपुरी तालुक्यातील घोटी टोल नाक्यावर आंदोलन केल्याप्रकरणी घोटी पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार गुन्हा दाखल झालेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर ,महानगर प्रमुख विलास शिंदे ,माजी आमदार निर्मला गावित, यांच्यासह अन्य पदाधिकारी तसेच कार्यकर्त्याचा समावेश आहे .दरम्यान नाशिक- मुंबई महामार्गावरील




खड्ड्याची समस्या जोपर्यंत दूर होत नाही ,तो पर्यंत टोल वसुली बंद करावी अशी मागणी करत मंगळवारी शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते यांनी घोटी टोल नाक्यावर आंदोलन केले होते. महामार्ग हा खड्डे मुक्त होत नाही तोपर्यंत टोल घेऊ नये, अशी मागणी करत शिवसेना पदाधिकाऱ्यांनी तब्बल एक तास घोटी टोलनाका बंद पाडला होता . या आंदोलनामुळे नाशिक-मुंबई महामार्गावरील वाहतूकीची मोठ्या प्रमाणात कोंडी झाली होती .वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्यामुळे प्रवाशांना खूप मोठा त्रास सहन करावा लागला होता. यावेळी शिवसैनिकांनी अनेक वाहने विना टोल सोडून दिले होते. वाहतूक कोळंबल्यामुळे आंदोलन आणि वाहनधारकांमध्ये वादही झाले होते, अखेर राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाने ३१ जुलै पर्यंत रस्ते सुस्थितीत करू, असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले होते.

## अंबाजोगाई बसस्थानकाची दुरावस्था संपेना प्रवाशांचा एक पाय चिखलात तर दुसरा खड्डयात



अंबाजोगाई/केवळ मराठवाड्यातच नव्हे तर राज्यात नावाजलेल्या अंबाजोगाई बसस्थानकाची दिवसेंदिवस दुरावस्था होऊ लागली आहे. अलीकडेच झालेल्या पावसामुळे बसस्थानकात खड्डे व चिखल यांचे साम्राज्य निर्माण झाले असल्याने प्रवाशांचा एक पाय चिखलात तर दुसरा खड्डयात अशी अवस्था झाली असून बसस्थानकातील रस्त्यांची ही दुरावस्था कधी थांबणार असा सवाल प्रवाशांतून होत आहे. गेल्याच महिन्यात अंबाजोगाई आगाराने अधिक कमाई करून राज्यात नाव मिळविले आहे. त्याच प्रमाणे अंबाजोगाई आगार व बसस्थाक मराठवाड्यातच नव्हे तर राज्यात उत्तम बसस्थानक म्हणून अशी ओळख आहे. मात्र अलिकडे झालेल्या पावसामुळे अंबाजोगाई बसस्थानकाची दुरावस्था झाली आहे. बसस्थानक परिसरातील खड्डयांमध्ये पावसाचे पाणी व चिखल यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. अंबाजोगाई बसस्थानकात विविध जिल्ह्यात दररोज विविध प्रवाशी मोठ्या संख्येने येत असतात. या बसस्थानकात प्रवाशांचे नेहमी वर्दळ मोठ्या प्रमाणात दिसून येते. परिणामी या दुरावस्थेला तोंड देत प्रवाशांना सामोरे जावे लागत आहे. प्रवाशांच्या दृष्टीने ही एक गंभीर समस्या असून या समस्येकडे अंबाजोगाई आगाराने लक्ष देवून अंबाजोगाई बसस्थानक स्वच्छ व सुंदर करावे अशी मागणी प्रवाशी वर्गाने केली आहे.

# अतिक्रमित गायरान जमिनीवरील नियोजित सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करा- रिपाइं(ए)ची मागणी

केज तालुक्यातील मागास प्रवर्गातील भूमिहीन ते कसत असलेल्या सरकारी अतिक्रमित जमिनीवर हो असलेले नियोजित सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करण्यात यावेत अशी मागणी रिपाइं (ए) च्या वतीने तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यांच्या नेतृत्वाखाली गायरानधारकांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील उमरी येथील मागासप्रवर्गातील भूमिहीन हे सरकारी गायारान सर्व्हे नंबर ४३ मधील ३० एकर जमीन हे ३२ कुटुंबे कसून त्यांच्या कुटुंबाची उपजीविका भागवीत आहेत. या गायरान जमिनीवर अतिक्रमण करणारे कुटुंबे ही मागील अनेक वर्षा पासून अतिक्रमण करून ती जमीन कसत असल्याच्या जुन्या निजामकालीन नोंदी आहेत. या अतिक्रमणाच्या संदर्भात अतिक्रमणधारकावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले होते. या जमिनीवर भूमिहीन अतिक्रमणधारक हे खरीप व रब्बीची पिके घेत आहेत. त्याच्या महसुली अभिलेख्याच्या नमुना नबर एक-ई नोंदी आहेत. दरम्यान या गायरान जमिनीवर सौरऊर्जा प्रकल्प उपभरणी संदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. त्या अनुषंगाने एका खाजगी कंपनीने मोजणी सुरू केली असल्याने गायरानधारक धास्तावले असून जर या ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभा राहिला तर त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल. म्हणून गायरानधरकानी दि. २४ जुलै तोज रिपाइं (ए) चे केज तालुकाध्यक्ष दिपक कांबळे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारांना एक निवेदन दिले आहे. निवेदनात त्यांनी गायाराान जमिन वरील नियोजित सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करण्यात यावा आणि मोजणी थांबविण्याची मागणी केली आहे. तसेच जर यावर तात्काळ निर्णय घेवून सौर ऊर्जा प्रकल्प रद्द केला नाही; तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. निवेदनावर आश्रुबा खरात, रुपचंद ढालमारे, सुरेश सोनवणे, मुरलीधर ढालमारे, रघुनाथ ढालमारे, वामन सोनवणे, संतराम सोनवणे, रंगनाथ धीरे, अरुण ढालमारे, सुदामती सोनवणे, नवनाथ सोनवणे, दत्तू सोनवणे, सुदंर सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या व अंगठे आहेत.

## उत्कृष्ट तपास केल्याबद्दल सपोनि आनंदसिंह साबळे, पोहेकॉ विठ्ठल वैराळ पोकॉ सुनील वैद्य यांचे स्वागत




जालना/असलम कुरेशी विविध गुन्ह्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल घनसावंगी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक आनंदसिंह साबळे, पोहेकॉ विठ्ठल वैराळ व पोकॉ सुनील वैद्य यांचे जालन्याचे पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी प्रशस्ती पत्र देऊन स्वागत केले. यावेळी पोलिस उपाधिक्षक आयुष नोपानी यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याबद्दल सहाय्यक पोलिस निरिक्षक आनंदसिंह साबळे, पोहेकॉ विठ्ठल वैराळ व पोकॉ सुनील वैद्य यांचे पोलिस उपनिरिक्षक किरण पवार, पोलिस उपनिरिक्षक रामदास काळे यांच्यासह पोलिस अधिकारी, कर्मचारी व मित्रपरिवारातून अभिनंदन होत आहे.

# जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करावेत

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा शनिवार दि.१८ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सेवा केंद्रावरुन किंवा इतर ठिकाणावरुन ऑनलाईन अर्ज दि.१६ सप्टेंबर २०२४ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. तरी जिल्ह्यातील मुख्याध्यापकांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे अर्ज जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी सादर करावेत, असे आवाहन अंबा-परतूर जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस.जी. पवार यांनी केले आहे. जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी-२०२५ साठी इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी पाचवीच्या मुख्याध्यापकांकडून प्रमाणपत्र भरुन घ्यावे, तसेच प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांचे छायाचित्र, स्वाक्षरी व पालकांची स्वाक्षरी करुन हे प्रमाणपत्र मुख्याध्यापकाद्वारे प्रमाणित करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज सादर करणे, जाहिरात, माहितीपत्रक, प्रमाणपत्र आदि www.navodaya.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज करण्यासाठी प्रमाणपत्र, छायाचित्र, स्वाक्षरी १० ते १०० केबीमध्ये स्कॅन करुन भरावेत. विद्यार्थ्यांचा जन्म दि.१ मे २०१३ ते ३१ जुलै २०१५ या कालावधीमधील असावा. जालना जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या व इयत्ता पाचवी वर्गात वर्ष २०२४-२५ मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी करता येणार आहे. असे प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, अंबा-परतूर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077